# Current Global Reviewer

UGC Approved International Research Refereed Journal For All Subjects & All Languages

ISSN 2319-8648 | Impact Factor - 2.143 | Indexed (IIJIF | UGC Approved Sr. No. 64310

SPECIAL ISSUE

10th February 2018 Issue: I Vol. III


On the Occasion of ICSSR Sponsored
Interdisciplinary National Seminar on

## Rural and Tribal Communities: Issues, Challenges and Remediation

Organised by

VES's Sarvajanik Arts & Commerce College,
Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar





Editor-in-Chief
Mr. Arun Godam

Guist Edoitors
Principal Dr. A. T. Patil
Sarvajanik Airs & Commerce College,
Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar

Convener
Assist. Prof. Ananda M. Kalbande
Head, Dept. of History,
Sarvajanik Airs & Commerce College,
Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar

Secretary
Assist. Prof. Rakesh B. Patil
Department of Sociology
Sarvajanik Airs & Commerce College,
Visarwadi, Tal. Navapur, Dist. Nandurbar

www.rjournals.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | मराठवाडयातील पाणी प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक दृष्टीक्षेप | प्रा.डॉ.डी.के.कदम | 57 |
| 17 | आदिवासी लोकांसाठी असलेली सामुदायिक विकास योजना | प्रा. डॉ. प्रसन्न सुरेश देशमुख | 61 |
| 18 | आदिवासियों में शिक्षा की समस्याएं और उनकी नीतियों का वर्तमान परिदृश्य | अभिलाष कुमार | 63 |
| 19 | विद्यार्थीचे भारत छोडो चळवळीतील योगदान | दिपक दिनकर किनगे | 68 |
| 20 | वाटचाल भरतीय अर्थव्यवस्थेची विकसनशीलतेकडून कॅशलेसतेकडे | विनोद आत्माराम नन्नवरे,<br>डॉ. मनोजकुमार गायकवाड | 70 |
| 21 | बदलत्या अर्थव्यवस्थेचे विकासात्मक उपाय | सचिन भास्कर कुंभार | 73 |
| 22 | "स्वातंत्र्य लढ्यातील भिल्ल चळवळीचे योगदान" | प्रा.डी. झेड. सावळे | 75 |
| 23 | महाराष्ट्रातील आदिवासींच्या शैक्षणिक स्थितीचे अर्थशास्त्रीय विवेचन. | प्रा.डॉ. बी. एस. भालेराव | 78 |
| 24 | "आदिवासी समाजाच्या आर्थिक समस्या व काही उपाय योजना : एक अभ्यास" | प्रा. ओ. आय. वसावे | 82 |
| 25 | भारतीय संविनाने आदिवासींना दिलेले संरक्षण : एक अभ्यास | प्रा.अंबादास नरसिंग पाचंगे | 86 |
| 26 | 'अक्कलकुवा तालुक्यातील कुपोषण : एक भयावह स्थिती' | प्रा.डॉ. सुनिल विक्रम कुवर | 90 |
| 27 | कृषीसंसाधनासमोरील आव्हणांच्या निर्मुलनासाठी आंमलात आणलेल्या शासकीय योजनांचे समाजशास्त्रीय अध्ययन | प्रा.डॉ.दत्तराव उत्तमराव राठोड | 97 |
| 28 | अनुसूचित जमातीची शैक्षणिक प्रगती : प्रश्न व उपाय | प्रा. डॉ. नंदकुमार विश्वनाथ मेटे | 102 |
| 29 | पंचायत क्षेत्र विस्तार (पेसा) कायदा - १९९६ सद्यस्थिती | डॉ.दिलीप जानकीराम घोंगडे | 107 |
| 30 | शिक्षणामध्ये आदिवासीच्या समस्या आणि धोरणे (विशेष संदर्भ: महाराष्ट्र राज्य) | डॉ.फोले संभाजी कोंडबाजी | 110 |
| 31 | शेतकरी आत्महत्या एक ज्वलंत प्रश्न | प्रा.अभिजित शरद भामरे | 115 |
| 32 | आदिवासीचे शिक्षण समस्या आणि धोरण | हरी संतोष गवळे | 118 |
| 33 | आदिवासी समाजातील कुटुंबसंस्था आणि त्यांच्या शाश्वत विकासातील अडचणींचा अभ्यास | प्रा. डॉ. मंदा तापीराम मोरे-थोरात | 122 |

CURRENT GLOBAL REVIEWER

Special Issue | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue I Vol. III , 10th Feb. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 2.143

# मराठवाडयातील पाणी प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक दृष्टीक्षेप

**प्रा.डॉ.डी.के.कदम**

*समाजशास्त्र विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर जि.नांदेड.*

(16)

भारत हा कृषिप्रधान देश आहे. पाणी शेतीचे जीवन व पाया आहे. शेती पाण्यावर जगते व पाण्याविना नष्ट होते. भारतीय शेती मान्सूनच्या पावसावर अवलंबून असल्यामुळे शेतीमध्ये वर्षात एकच पीक घेता येते. तर कधी एक पीक येईल याचा भरवसा नाही. मराठवाडयातील पाणी प्रश्न अतिशय गंभीर आहे. मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि पाणी प्रश्न यांचा अतिशय निकटचा संबंध आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान आहे. शेतात जी उत्पादने उत्पादित होतात त्यापासून शेतकऱ्यांना पैसा मिळवून देतात. देशातील जास्तीत जास्त लोकसंख्येला शेतीतंत्र रोजगार उपलब्ध होतो. औद्योगिक विकासातही शेतीला महत्त्व आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कृषी क्षेत्राचे आर्थिक विकासात अतिशय मोलाचे योगदान आहे. शेतीच्या विकासावरच उद्योगांचा विकास अवलंबून आहे. शेती हाच ग्रामीण समजाच्या विकासाचा महत्त्वाचा घटक असून ग्रामीण समाजातील लोकांच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन आहे. ग्रामीण भागात राहणारे सर्वच शेतकरी नाहीत. ग्रामीण समाज हा अनेक जातीत म्हणजेच बलुतेदार आणि अलुतेदार, मजूर, शेतकरी अशा घटकात विभागलेला आहे. हे सर्व घटक शेतीवर अवलंबून आहेत. भारतीय शेती मान्सूनच्या पावसावर असून शेती पारंपरिक पद्धतीने केली जाते. आज वाढत्या लोकसंख्येला पुरेल इतके उत्पादन होत नाही. उत्पादन झाले तर शेती मालाला भाव मिळत नाही. अन्नधान्य अपुरे, कधी जास्त होते अशी अवस्था निर्माण

झाली. शेतीमालाला योग्य भाव न मिळणे, जमीन धारणेतील विषमता, भांडवलाची कमतरता, बेकारी, अर्धबेकारी, भूमी सुधारणेचा मंद वेग, शेतीला पाणी पुरवठयाचा अभाव, आधुनिक बी-बियाणे याविषयी अज्ञान, अतिरीक्त रासायनिक व किटकनाशक ओषधांचा वापर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांची अवस्था ना पारंपरिक आहे, ना आधुनिक (प्रगत) आहे. शेतकऱ्यांची अवस्था अतिशय दैन्य होतच चालली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतांना दिसून येतात. मान्सूनच्या पावसावर अवलंबून शेती, सततचे अवर्षण आणि सरकारचे धोरण यामुळे आजचा शेतकरी देशोधडीला लागला आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ६४ वर्षातच ग्रामीण जीवनाचा मुख्य आधार असलेली शेती व्यवस्था आता मोडकळीस आलेली आहे. शेतकरी या चक्रात अडकला असून त्याला यातून बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नसल्यामुळे आत्महत्या करत आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या या मागे अनेक कारणे कारणीभूत आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात मराठवाडयातील पाणीप्रश्न आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या यावर एक दृष्टिक्षेप टाकून अभ्यास केला आहे.

**अध्ययनाचा उद्देश (Study of Objects) :-**

१) मराठवाडयातील पाणी परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या कारणांचा अभ्यास करणे.

३) शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि सिंचन व्यवस्था यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनासाठी तथ्य संकलन मिळवितांना व्दितीय तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केला आहे. ज्यामध्ये संशोधन विषयाशी संबंधित पुस्तके, ग्रंथ व निमशासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, मासिके, शोधप्रबंध, कार्यशाळा, सेमीनार, चर्चासत्र तसेच इंटरनेटवरील माहितीचा आधार घेण्यात आला आहे. तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा अवलंब करण्यात आला आहे.

**तथ्य विश्लेषण :-**

समाजशास्त्रीय विचारवंत इमाईख दुर्खिम यांनी 'आत्महत्या' (Suicide) हया ग्रंथात १८८७ मध्ये लिहीले त्यात त्यांनी आत्महत्याच्या व्याख्या, कारणे आणि प्रकार यांचे सविस्तर विश्लेषण केले. तेंव्हा आत्महत्या ही समस्या नव्हती. परंतु आज आत्महत्या ही एक सामाजिक

समस्या बनली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चर्चेचा विषय ग्रामीण भागापासून ते दिल्लीपर्यंत भारतीय संसद भवनापर्यंतचा बनला आहे. आजच्या शेतकऱ्याच्या आत्महत्या हया प्रभावशून्य आत्महत्या या प्रकाशात मोडतात. शेतकरी नैसर्गिक, पर्यावरण, राजकीय धोरण व व्यापाराच्या चक्रात टिकत नाही तेंव्हा निराशा येते यातून शेतकरी आत्महत्या करतात.

भारतात राष्ट्रीय क्राईम ब्युरो रिपोर्टनुसार सन २०१२ मध्ये १,३५,४४५ एवढया आत्महत्या झाल्या. त्यापैकी १३,७५५ एवढया शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत्या. भारतातील २९ घटक राज्यापैकी महाराष्ट्र, आंधप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि केरळ या पाच राज्यात १०,४८६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. भारतातील इ.स.२०१२ मध्ये भारतात १३,७५५ आत्महत्यापैकी महाराष्ट्रातील ३७८६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. इ.स. २०११ मध्ये १,३५,५८५ एकूण आत्महत्या झाल्या त्यातील १४,२०७ आत्महत्या शेतकऱ्यांच्या होत्या. २०१० मध्ये १,३४.५९९ आत्महत्या भारतात झाल्या त्यातील १५,९६५ आत्महत्या शेतकऱ्यांच्या होत्या. सन १९९५ ते २०१३ पर्यंत भारतात २,९६,४३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. महाराष्ट्रात सन २००९ ते २०१६ पर्यंत महाराष्ट्रात २५,६१३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सन २००५ ते २००९ पर्यंत गुजरात ३८७, केरळ ९०५, पंजाब ७५ आणि तामिळनाडू २६.

महाराष्ट्रात सन २००१ ते २०१७ आक्टोंबरपर्यंत १२,८०५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. १ जानेवारी ते ऑगस्ट २०१५ पर्यंत मराठवाडयात ५८० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून एक बीड जिल्हयात ११५ आत्महत्या शेतकऱ्यांनी केल्या. तर १ जानेवारी ते ३१ ऑक्टोंबर पर्यंत विदर्भात ९०७, मराठवाडयात ७८९ आत्महत्या झाल्या. महसुल मदत व पुनर्वसन विभागाच्या अधिकृत नोंदीनुसार २००१ ते २०१५ या कालावधीत राज्यात २० हजार ८७३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी १० हजार ३९० म्हणजेच एकुण ४९.७ टक्के शेतकऱ्यांच्या आत्महत्या अपात्र ठरविण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा या विभागात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण सर्वात जास्त आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या यासाठी प्रामुख्याने ठरते. 'पीककर्ज' शेतीसाठी घेतलेले कर्ज, शेतीत गुंतवायचे पण दुष्काळ नापीकी यामुळे ते फेडण्यासाठी उत्पन्न शेतीतून मिळत नाही. बहुतांश शेतकरी कर्जबाजारी होतात. कर्जाच्या वाढत्या बोजाने त्रस्त होऊन त्यातलेच काहीजण मृत्यूला जवळ करतात तेच शेतकऱ्यांच्या आत्महत्या आहेत. पीक कर्ज हेच शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण ठरु शकत नाही. कर्जमुक्त एक उपाय ठरु शकेल काय ? याबाबतीत विचार करणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या व कर्जमाफीचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. शेती प्रश्नाची चर्चाही गांभीर्याने होतांना दिसून येते. महाराष्ट्रात चंद्रपुर जिल्हयात मुल येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा सुरु होण्यापूर्वी एकच तास अगोदर भदुर्गी या गावातील कर्जबाजारीपणाला कंटाळून उमेद चायकोटे या शेतकऱ्याने केलेली आत्महत्या. अॅड.जनरल श्रीहरी आणे यांनी तर शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या की, शेतकऱ्यांकडे पुरेसे पेसे नाहीत, पुरेसा पाऊस नाही आणि पुरेशी व तत्पर मदतही नाही. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या आत्मसन्मानाला ठेच पोहचल्यानंतर शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करणार अशी तीव्र टिका केली.

मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्याबाबत टाइम्स ऑफ इंडिया ने दिलेल्या वृत्ताची गंभीर दखल घेत हायकोर्टाने शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न 'सुओ मोटो' जनहित याचिकेव्दारे विचारार्थ घेतला आहे.

आज वाढती लोकसंख्या, पाण्याची उपलब्धता, पावसाच्या पाण्याची अनिश्चितता आणि अनियमितपणा, प्रदुषणाचे वाढते प्रमाण यामुळे पाण्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली. मराठवाडयातील काही जिल्हे अवर्षणप्रवणग्रस्त क्षेत्रात येतात. सुखनाथकर समितीच्या मते ज्या प्रदेशात वार्षिक सरासरी ७५० मि.मी. पेक्षा कमी पाऊस पडतो तो भूभाग म्हणजे अवर्षणग्रस्त भाग होय. मराठवाडयातील जालना, लातूर, उस्मानाबाद, बीड हे अवर्षणप्रवण जिल्हे म्हणून ओळखले जातात. अवर्षणग्रस्त भागात पावसाचा प्रारंभ व शेवट अनिश्चित व प्रमाणही कमी असते. अवर्षणप्रवण भागात निसर्गाच्या पाण्याची उपलब्धता कमी आहे. मराठवाडयातील सर्व जिल्हयात विहीरी, नदया, तलाव, कुपनलिका इत्यादी पाणी पुरवठयाची स्त्रोत आहेत. प्रत्येक गावात आड, विहीरी आढळतात. प्रत्येक जिल्हयात काही मोठे तलाव, काही मध्यम तलाव प्रत्येक जिल्हयात मोठे धरणे आहेत. आज नांदेड जिल्हयात कै.यशवंतराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प आहे. हा प्रकल्प राज्यातील सर्वात मोठा प्रकल्प असून गोदावरी नदीवर ११ बंधारे आहेत. औरंगाबाद जिल्हयात गोदावरी नदीवर पेठणजवळ जायकवाडी हे धरण आहे. हे नाथसागर या नावाने ओळखले जाते. परभणी जिल्हयात येलदरी धरण आहे. इतर जिल्हयाच्या तुलनेत परभणी जिल्हयात अनेक

नदया प्रवेश करतात. या नदयावर धरणे आहेत. सिध्देश्वर येथे मातीचे धरण असून दुसरे मातीचे धरण पाथरी तालुक्यात दुधना नदीवर ब्राह्मणवाडी येथे आहे. जायकवाडी धरणाचे पाणी परभणी जिल्ह्याला जास्त मिळते या धरणाचा लाभ हिंगोली जिल्ह्यात होतो. लातूर जिल्ह्यात मांजरा, तेरणा, मन्याड या तीन नदया आहेत. मांजरा लातूर जिल्ह्यात सर्वात मोठी नदी आहे. जालना जिल्ह्यात दुधना, कल्याण, गिरजा व जुई व धामण, जीवरेखा गल्हारी ही धरणे आहेत. बीड जिल्ह्यातून मांजरा, सिंधफणा, बिंदुसारा, रोना, कुंडलिका, सरस्वती या पाण्याच्या नदया वाहतात. माजलगांव येथे धरण आहे. तर बीडमधील गेवराई, बीड, माजलगांव यांचा समावेश आहे. पाणी समस्येवर मात करण्यासाठी जलस्त्रोतांची निर्मिती हे जलस्त्रोत निर्माण आहेत.

सिंचनसोई उपलब्ध करुन देण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात योजनाबद्ध प्रयत्न करण्यात आले असून लागवडीखालील शेतजमिनीपैकी फक्त सुमारे ३० टक्के जमिनीलाच निश्चित स्वरुपाचा पाणीपुरवठा झाला. महाराष्ट्रात तर हे प्रमाण १० टक्के इतकेच आहे. मराठवाडयातील चित्र अतिशय गंभीर स्वरुपाचे आहे. शेती आजही मान्सून पावसावर अवलंबून आहे. शेतीक्षेत्रासाठी सिंचनाची सुविधा योग्य प्रमाणात नाहीत त्यामुळे शेतीतून उत्पन्न कमी मिळते त्यामुळे अनेक आर्थिक संकटे पुढे राहतात यातून शेतकरी आत्महत्या करतात.

शेतकरी वर्गात अज्ञान आहे. कोणत्या कोणत्या कारणासाठी पाणी वापरतो याचे गणित ठेवणे आवश्यक आहे. शेतीसाठी ६५% पाण्याचा वापर केला जातो. भारतीय शेतकऱ्यांमध्ये शेतीला जे पाणी देतात त्या विषयी अज्ञान आहे. मराठवाडयात शेतकरी वर्गात पाणी वापरासंबंधी अज्ञान आहे. पाणी पिकांना न देता जमिनीला देतात. शेतीला जास्त पाणी दिले तर जास्त उत्पन्न निघते असा शेतकऱ्यांमध्ये गैरसमज आहे. त्यामुळे दांडसरी वाफे पद्धतीने पाणी देतात त्यामुळे ७० टक्के पाणी वाया जाते. जमिनीची नासाडी होते. शेतकरी दुपारच्या वेळी शेतीला पाणी देतात त्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन होते. ग्रामीण भागात ज्या शेतकऱ्याकडे जास्त पाणी असते ते शेतीला जास्त पाणी देतात. श्रीमंत शेतकरी १२०० फुटापर्यंत बोअरवेल करतात ज्यांच्याकडे पाणी जास्त आहे शेतीला जास्त पाणी देतात त्यामुळे उत्पन्न घटते आणि ज्यांच्याकडे पाणी नाही म्हणून शेतीला पाणी मिळत नाही परिणामी उत्पन्नात मोठी घट होते. शेतकरी आर्थिक संकटात येतो. शेवटी आत्महत्येचा मार्ग पत्करतांना दिसून येतो.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे अनेक कारणे कारणीभूत आहेत. त्यातील एकमेव कारण शेतकऱ्यांचे शेतातील निघणारे अल्प उत्पादन होय. शेतीत अल्प उत्पादन येण्याची अनेक कारणे आहेत. त्या अतिरीक्त रासायनिक खतांचा वापर, पीक पद्धत, शेतीविषयक अज्ञान, हव्यास फॅशन चंगळवादी संस्कृती, राजकीय ध्येयधोरणे, बाजार व्यवस्था इत्यादी शेतीमधून अल्प उत्पादन होण्यासाठी पाणी महत्त्वाचा घटक आहे. सिंचन क्षेत्राचे कमी प्रमाण, अपुऱ्या सिंचनसोई, पाण्यावर श्रीमंताची मालकी, पाणी वापराविषयी अज्ञान म्हणजेच पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे शेतीतून अल्प उत्पादन होते. शेवटी अल्प उत्पादन, आर्थिक संकट आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांचा परस्पर संबंध येतो. मराठवाडयातील सिंचन क्षेत्र वाढवण्यासाठी भरपूर प्रमाणात वाव आहे. जे जलस्त्रोत, जलसाठे आहेत. त्याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे, ठिबकसिंचन, तुषारसिंचन सारखी साधने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आज बारीक टयुबला शास्त्रशुद्ध पद्धतीने विशिष्ट अंतरावर प्रत्येक सहा इंच किंवा एका फुटावर पंक्चर करुन जमिनीच्या अंतर्गत भागत सहा इंचावर खोलवर टाकून पिकाला जमिनीच्या आतूनच पाणी देण्याची नवी बायोबॉल पद्धती अलीकडे सुरु झाली. आज ठिबक सिंचन, तुषार सिंचन, पद्धतीच्या पुढची पद्धत बायोवॉल पद्धत होय. बायोवॉल पद्धतीमुळे पाण्याची मोठया प्रमाणात बचत होते. पाण्याचे बाष्पीभवन होत नाही. पाणी पिकांच्या मुळांना मिळते. या पद्धतीचे ज्ञान शेतकऱ्यांना देणे आवश्यक आहे. मराठवाडयात तलाव निर्माण करणाऱ्या परंपरेकडे दुर्लक्ष होण्यास सुरुवात झाली तर १८ व्या व १९ व्या शतकापासून या तलावाची खुपच उपेक्षा झाली. मुबलक प्रमाणात पाण्याचे प्रदेश असणारे आज दुष्काळग्रस्त होत आहेत. आधुनिक समाजात जलसाठे निर्माण करण्याने पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याचे, पुनर्भरण करण्याचे काम मर्यादित होऊन भुगर्भातील पाणी उपश्याचे तंत्रज्ञान विकसित करुन १२०० फुटापर्यंत (बाराशे) खोल बोअरवेल करुन पाण्याचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे.

महाराष्ट्रात अण्णा हजारे यांचे राळेगणसिद्धी, पोपटराव पवार यांचे हिवरे बाजार, शिरपुर पॅटर्न यामुळे गावाचा चेहरा मोहरा बदलला आहे. मराठवाडयातील पाणीप्रश्न सुटला सिंचन क्षेत्र वाढले तर आपोआपच शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबतील. यासाठी शेततळी निर्माण करण्यास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. प्राचीन जलव्यवस्थापन आधुनिक तंत्रज्ञान यांचा समन्वय साधणे. पाणी वापराचे ज्ञान करुन देणे.

जनसामान्यांच्या मनात पाण्याबद्दल जागृती व आत्मीयता निर्माण करणे, १० ते २० शेतकऱ्यांचा एक गट निर्माण करुन पावसाळयात वाहणाऱ्या नाल्या-नाल्यातून शेततळी भरुन घेतल्यास त्या पाण्याचा उपयोग घेता येतो. म्हणून समाजात जलसाक्षरता वाढविणे यासाठी प्रशिक्षण, प्रबोधन व संशोधन या तीन सुत्राची गरज आहे. यामुळे मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यास मदत होईल.

**संदर्भसूची :-**

१) के. डी.स.प्री.पु.देसाई, 'भारतीय अर्थव्यवस्था' निराली प्रकाशन, औरंगाबाद.
२) शम्भूलाल दोषी, प्रकाशचन्द्र जैन, रावत पब्लिकेशन्स जयपूर एंव नई दिल्ली.
३) www.farmer suicide in maharashtra.
४) लोकसत्ता ११ जानेवारी - २०१८.
५) ना.धो.महानोर, 'शेतीसाठी पाणी' साकेत प्रकाशन, औरंगाबाद.